दि. १३/०२/२०१९

# संचालनालय वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
## तदर्थ पदोन्नतीसाठी संमतीपत्रे घेण्याच्या कार्यक्रमाचे वेळापत्रक...
### (मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद करिता)
### :: सुचनापत्र ::

राज्यातील सर्व १६ शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्यासाठी शासन पत्र क्र.पदभ-२०१५/प्र.क्र.२२६/वैसवा-२, दि.२८.८.२०१८ अन्वये संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना दि.२८.०८.२०१८ पासून पुढील ६ महिने इतक्या कालावधीकरीता सहयोगी प्राध्यापक पदावरुन, प्राध्यापक या पदावर व सहाय्यक प्राध्यापकांना सहयोगी प्राध्यापक या पदावर (चिकित्सालयीन व अचिकित्सालयीन विषयातील पात्र अध्यापकांना) निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्याकरीता तदर्थ पदोन्नती देण्याकरीता मुदतवाढीचे अधिकार प्रदान करण्यांत आल्यानुसार संचालनायामार्फत (मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद करिता) जाहीर सूचना प्रसिद्ध करण्यात येत आहे.

शासन पत्र दि.२८.८.२०१८ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकांचे रिक्त प्रमाण पाहता, भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांची पुर्तता करण्याकरीता विद्यार्थी हित तसेच दिवसेंदिवस वाढत असलेली रुग्णांची संख्या व इतर अनुषंगिक बाबी विचारात घेता, चिकित्सालयीन विषयातील अध्यापकांना केवळ मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयातील विविध विषयातील अध्यापकांना संस्थेतील रिक्त असलेल्या प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या पदावर निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात सहा महिन्यांकरीता (१८० दिवसांकरिता) तदर्थ पदोन्नती देण्याबाबत शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

त्याअनुषंगाने मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील विविध चिकित्सालयीन विषयातील रिक्त असलेल्या पदांवर निम्न संवर्गातील तदर्थ पदोन्नतीसाठी निवड झालेल्या अध्यापकांचे शोधनिबंधाबाबतचे प्रमाणपत्र व अनुभव प्रमाणपत्र संबंधित अधिष्ठातांनी देण्यात यावे.

खालील नमूद चिकित्सालयीन विषयातील रिक्त असलेल्या पदांसाठी दि.०१.०१.२०१८ रोजीची राज्यस्तरीय ज्येष्ठता यादीतील त्या-त्या विषयातील ज्येष्ठतेनुसार दिलेल्या क्रमांकाप्रमाणे बोलाविण्यात आलेल्या उमेदवारांनी पदोन्नतीस पात्र असल्यास नमूद दिनांकास व वेळेत संचालनालयात आवश्यक त्या कागदपत्रांसह (शोधनिबंध व इतर शैक्षणिक प्रमाणपत्रे) उपस्थित रहावयाचे आहे.

...२...

## मुंबई, पुणे, नागपूर व औरंगाबाद येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील विविध चिकित्सालयीन विषयातील रिक्त पदे व उपलब्ध उमेदवारांची माहिती...

| अ.क्र. | दिनांक | वेळ | भरावयाचे पद | विषय | निम्न संवर्गातील दि.१.१.२०१८ च्या ज्येष्ठता सूचीतील क्रमांक | रिक्त पदांची संख्या | संस्थेतील रिक्त पदांची संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | १८.०२.२०१९ | दुपारी ०२:०० वा. ते कामकाज संपेपर्यंत | प्राध्यापक | शल्यचिकित्साशास्त्र | १ ते ६७ | ०१ | ट्रामा नागपूर-१ |
| | | | | मनोविकृतीशास्त्र | १ ते ६ | ०२ | बैजीशावैम, पुणे-१<br>शावैम,औरंगाबाद-१ |
| | | | | सुघटनशल्यचिकित्साशास्त्र | २ ते ३ | ०१ | शावैम, नागपूर-०१ |
| | | | | उरःशल्यचिकित्साशास्त्र | १ ते २ | ०१ | अ.वि.रु. नागपूर-१ |
| | | | | मुत्रशल्यचिकित्साशास्त्र | १ ते २ | ०२ | ग्रं.शा.वै.म., मुंबई-१ अ.वि.रु. नागपूर-१ |
| | | | | औषधवैद्यकशास्त्र | १ ते ४६ | ०२ | ग्रंशावैम,मुंबई-१<br>कर्क.रु.,औरंगाबाद -१ |
| | | | | कान, नाक व घसाशास्त्र | १ ते १५ | १ | कर्क.रु.,औरंगाबाद -१ |
| | | | | गॅस्ट्रोएन्ट्रॉलॉजी | निरंक | १ | सर,ज.जी.समुह -१ |
| | | | | हृदयरोगशास्त्र | १ | १ | शावैमरु, औरंगाबाद-१ |
| | | | | क्षकिरणशास्त्र | | १ | बैजीशावैम,पुणे-१ |
| | | | | क्षयरोगशास्त्र | | १ | शावैम,औरंगाबाद-१ |
| | | | | किरणोपचारशास्त्र | | १ | शावैम.रु,औरंगाबाद-१ |
| | | | | बालरोगचिकित्साशास्त्र | | ०१ | शावैम, औरंगाबाद-१ |
| | | | सहयोगी प्राध्यापक | शल्यचिकित्साशास्त्र | १ ते ५४ | ०१ | शावैम, औरंगाबाद-०१ |
| | | | | मनोविकृतीशास्त्र | १ ते १५ | ०२ | शावैम, औरंगाबाद-०१<br>इंगांशावैम,नागपूर-०१ |
| | | | | मज्जातंतुशल्यचिकित्साशास्त्र | १ ते २ | ०३ | ग्रंशावैम,मुंबई-०१<br>अविरु,नागपूर-०१<br>ट्रामा नागपूर-०१ |
| | | | | उरःशल्यचिकित्साशास्त्र | १ ते ३ | ०३ | रुग्णा.औरंगाबाद-०१<br>अविरु,नागपूर-०२ |
| | | | | औषधवैद्यकशास्त्र | १ ते ६७ | ५ | शावैम,पुणे-१<br>शावैम, औरंगाबाद-३<br>कर्क.रु.,औरंगाबाद -१ |
| | | | | अस्थिव्यंगोपचार | १ ते ४५ | ३ | बैजीशावैम, पुणे-१<br>शावैम, नागपूर-१<br>शावैम,औरंगाबाद-१ |
| | | | | त्वचा व गुप्तरोगशास्त्र | १ ते ११ | २ | ग्रंशावैम, मुंबई-१<br>शावैम,औरंगाबाद-१ |
| | | | | हृदयरोगशास्त्र | १ ते २ | १ | शावैमरु, औरंगाबाद-१ |
| | | | | किरणोपचारशास्त्र | | ३ | कावआरु, मुंबई-२<br>शावैमरु, औरंगाबाद-१ |
| | | | | क्षकिरणशास्त्र | | ६ | ग्रंशावैम-१, जजीरु-२,<br>गोतेरु-१,बैजीशावैम पुणे-१,<br>ससरु-पुणे-१,<br>शावैम,औरंगाबाद-२<br>कर्करोग,औबाद-१ |
| | | | | बालरोगचिकित्साशास्त्र | | ०३ | ग्रंशावैम,मुंबई-१<br>सेंट जॉ.रु.मुंबई-१<br>कर्क.रु.,औरंगाबाद -१ |
| | | | | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | | ०४ | ग्रंशावैम,मुंबई-४ |
| | | | | नेत्रशल्यचिकित्साशास्त्र | | ०१ | शावैम, नागपूर-१ |

...३...

जाहिरातीच्या अटी व शर्ती :-

१. सदरहु जाहिराती मुंबई, पुणे, नागपूर औरंगाबाद येथील वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालये/कर्क/ट्रामा केअर रुग्णालयातील रिक्त जागा भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांची पुर्तता करण्याकरिता आहे. त्यामुळे इतर संस्थेतील रिक्त जागांकरिता प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, व तसे आदेशही निर्गमित केले जाणार नाहीत.

२. वरील वेळापत्रकानुसार वेळेवर उपस्थित न राहिल्यास तदर्थ पदोन्नतीसाठी विचार करता येणार नाही. त्यांच्याऐवजी ज्येष्ठता सूचीतील पुढील पात्र व उपस्थित असलेल्या कनिष्ठ उमेदवारास तदर्थ पदोन्नती देण्यांत येईल.

३. ज्येष्ठतेनुसार बोलाविण्यांत आलेल्या उमेदवारांपैकी जो उमेदवार अपात्र आढळून आल्यास त्यांचा तदर्थपदोन्नतीसाठी विचार केला जाणार नाही.

४. तात्पुरत्या पदोन्नतीसाठी उपरोक्त नमूद केलेल्या संख्येने बोलविले असले तरी, रिक्त पदे भरल्यानंतरउर्वरित बोलविण्यात आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

५. ज्येष्ठता यादीतील ज्या उमेदवारांनी एम.डी./एम.एस./पी.एचडी. किंवा डी.एन.बी. ही शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली आहे, अशाच उमेदवारांनी उपस्थित रहावे.

६. संस्थानिहाय रिक्त पदांचा पदनिहाय तक्ता वर दिलेला आहे. सदर तक्त्यातील नमूद ठिकाणाच्या तदर्थ दिलेल्या रिक्त जागा या भरण्यात येतील. इतर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रिक्त जागा भरण्यात येणार नाहीत. नमूद केलेल्या रिक्त पदांची संख्या कमी-अधिक होऊ शकते.

७. वरील वेळापत्रकानुसार निवड झालेल्या उमेदवारांना/अध्यापकांना सहा दिवसांमध्ये निवड झालेल्यासंस्थेत रुजू व्हावे लागेल. त्याचबरोबर भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार आवश्यक ते हमीपत्र अधिष्ठातांमार्फत सादर करणे अनिवार्य राहील.

८. सदर निवड प्रक्रिये दरम्यान सहयोगी प्राध्यापकास तदर्थ प्राध्यापक म्हणुन पदोन्नती मिळाल्यास त्यांची रिक्त मुळ सहयोगी प्राध्यापकाचे रिक्त होणारे पद या फेरी दरम्यान भरण्यांत येणार नाही.

९. या फेरी दरम्यान लेखी संमती दिलेला उमेदवार रुजू न झाल्यास त्याचा पुढील एक वर्षाकरीता तदर्थ पदोन्नतीसाठी विचार केला जाणार नाही.

१०. या फेरी दरम्यान पदोन्नती झाल्यानंतर रिक्त होणारे मुळचे पदावर पुन्हा तदथर् स्वरुपात पात्र उमेदवाराची तदर्थ पदोन्नतीने नेमणुक करण्यांत येईल, व ते पद रिक्त राहणार नाही त्याची प्रक्रिया नंतर स्वतंत्रपणे करण्यांत येईल.

११. शासन स्तरावरुन महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत अथवा निवड मंडळामार्फत अथवा सेवा नियमिततेने अथवा बदलीने नियमित स्वरुपात निवड झालेला उमेदवार संस्थेमध्ये रुजू झाल्यानंतर सदरील तदर्थ पदोन्नती आपोआप संपुष्टात येईल त्याकरीता वेगळे आदेश काढण्यात येणार नाहीत. पदावनत झाल्यानंतर सदर उमेदवाराचे मुळचे पद राज्यात ज्या ठिकाणी रिक्त असेल, त्या ठिकाणी त्यांची पदस्थापना करण्यांत येईल.

१२. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार अतिरिक्त पदे असल्यास तदर्थ पदोन्नती देण्याची शिफारस करण्यांत येणार नाही.

१३. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार सुधारीत अध्यादेशानुसार संशोधन लेखाच्या प्रती सोबत आनणे अनिवार्य आहे. तथापी खालील विवरणपत्रातील शोधनिबंधाचे प्रमाणपत्र संचालनालयातील ई-मेल आयडी **cbranchdmer@gmail.com** वर दि.१५/०२/२०१९ रोजी अखेर सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत प्राप्त होतील असे पाठवावे.

...४...

**शोधनिबंधाविषयी माहिती सादर करण्याबाबतचे विवरणपत्र**

अध्यापकाचे नांव :.............................................................पदनाम व विषय : ............................................................

संस्थेचे नांव :.....................................................................................................................................................

| अ.क्र. | प्रसिद्ध केलेले शोधनिबंध | | | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| | भा.आ.प. नुसार आवश्यक | 1 st Auther | 2 nd Auther | National | International | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही/-
(नांव...............................)
वरिष्ठ प्राध्यापक तथा सदस्य,
शोधनिबंध पडताळणी समिती

सही/-
नांव...............................)
वरिष्ठ प्राध्यापक तथा सदस्य,
शोधनिबंध पडताळणी समिती

सही/-
(नांव...............................)
अधिष्ठाता तथा अध्यक्ष,
शोधनिबंध पडताळणी समिती

१४. संस्थेमध्ये सन २०१७-१८ मधील भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरिक्षणाच्या दरम्यान ज्या तदर्थ पदोन्नती दिलेल्या अध्यापकांना संशोधन लेख भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांनुसार नसल्यामुळे स्विकृत केले नव्हते त्यांनी मुलाखतीस येताना संशोधन लेख केलेले असल्यास सोबत आणावे. ज्या अध्यापकांनी अद्यापही संशोधन लेख केलेले नाहीत, त्यांचा यापुढे तदर्थ पदोन्नतीसाठी विचार करण्यांत येणार नाही.

१५. अध्यापकांनी मुलाखतीस येताना स्वखर्चाने उपस्थित रहावे.

संचालक,
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.